# फ्लिपकार्टने आपल्या पुरवठा साखळीतून सिंगल-यूझ प्लास्टिक पॅकेजिंग १०० टक्के काढून टाकण्याचा महत्त्वाचा पल्ला गाठला

- *२०२१ पर्यंत आपल्या पुरवठा साखळीतून सिंगल-यूझ प्लास्टिक पॅकेजिंग काढून टाकण्याची आपली बांधिलकी जपली*
- *विक्रेता परिसंस्थेतून सिंगल-यूझ प्लास्टिक पॅकेजिंग पूर्णपणे काढून टाकण्यासाठी आपल्या विक्रेता परिसंस्थेसोबत प्रयत्न सुरू*

**बंगळुरु – 7 जुलै 2021**: फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने भारतातील आपल्या सर्व फुलफिलमेंट सेंटर्समधून सिंगल-युझ प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर संपूर्णपणे बंद केला आहे. २०२१ पर्यंत आपल्या पुरवठा साखळीत प्लास्टिकमुक्त पॅकेजिंगचा वापर व्हावा ही सामाजिक बांधिलकी त्यांनी जपली आहे.

भारतभरातील फ्लिपकार्टच्या ७० हून अधिक केंद्रांमध्ये हा बदल करण्यात आला आहे. या सर्व ठिकाणी पर्यावरणस्नेही पेपर श्रेड्सचा वापर, पॉली पाऊचेसच्या जागी पुनर्वापरातील पेपर बॅग्स, बबल रॅप्सऐवजी कार्टन वेस्ट श्रेडेडे मटेरिअल आणि २ प्लाय रोल अशा विविध शाश्वत, मोठ्या प्रमाणात वापरता येतील अशा उपायांतून फ्लिपकार्टने सिंगल-यूझ प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर पूर्णपणे थांबवला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत ईपीआर नियमांचे पूर्णपणे पालन होईल तसेच पुनर्वापराच्या संपूर्ण नेटवर्कमध्ये ग्राहकांपर्यंत पोहोचणारे सिंगल-यूझ प्लास्टिक पुनर्वापरात येईल याची खातरजमा केली जात आहे.

हा महत्त्वाचा टप्पा गाठल्यानंतर फ्लिपकार्ट आता ग्राहकांना आपल्याकडूनच थेट ऑर्डर पाठवणाऱ्या त्यांच्या विक्रेता भागीदारांसोबत सक्रियपणे काम करून त्यांना पर्यायी साधनांचा वापर करण्याबाबत शिक्षित करत आहे आणि त्यासंदर्भातही साह्यही करत आहे. इतकेच नाही, फ्लिपकार्ट संपूर्ण परिसंस्थेसोबत काम करून प्लास्टिकसाठी अधिक प्रमाणात पुनर्वापराचे चक्र कसे राबवता येईल, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे संपूर्ण परिसंस्था अधिक शाश्वत भविष्याच्या दिशेने मार्गक्रमण करू शकेल. सक्रिय हस्तक्षेप आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून फ्लिपकार्टने त्यांच्या सेलर फुलफिलमेंटमध्ये सिंगल-यूझ प्लास्टिक पॅकेजिंगमध्ये २७ टक्के घट केली आहे.

**फ्लिपकार्टच्या पुरवठा साखळीचे प्रमुख आणि वरिष्ठ उपाध्यक्ष हेमंत बद्री** म्हणाले, "*फ्लिपकार्टमध्ये आम्ही शाश्वत आणि जबाबदार व्यवसाय पद्धतींवर प्रचंड भर देतो. शाश्वत परिसंस्था निर्माण करण्याची आमची बांधिलकी जपण्याच्या दिशेने आम्ही टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे १०० टक्के सिंगल-यूझ प्लास्टिक बंद करण्यासाठीचे प्रयत्न. कोविडमुळे काहीशा आव्हानात्मक ठरलेल्या वर्षांत काम करताना आम्ही हे यश गाठले आहे आणि आमच्या टीमने योग्य प्राधान्यक्रम जपला याचा आम्हाला अभिमान वाटतो. आता आमच्या विक्रेता परिसंस्थेतही शाश्वत पॅकेजिंग पर्याय वापरले जावेत*

*यावर भर देत आम्ही संपूर्ण पुरवठा साखळीत एक सकारात्मक पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम साधण्याचा प्रयत्न करत आहोत."*

फ्लिपकार्टच्या इतर महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये **'ई-कॉमर्स रेडी पॅकेजिंग'**चाही समावेश आहे. यात पॅकेजिंगचा दुसरा स्तर न वापरता सुमारे १५ टक्के उत्पादने पाठवणे फ्लिपकार्टला शक्य झाले आहे. कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि होम फर्निशिंगमधील ब्रँड्ससोबत काम करून त्यांची उत्पादने मूळ उत्पादित/ब्रँड पॅकेजिंगसह पाठवता यावीत आणि बाह्य आवरणाचा वापर टाळला जावा यासाठी प्रयत्न करत आहे. त्याचप्रमाणे पॅकेजिंगसाठी पुनर्वापरातील आणि पर्यायी मटेरिअल्सचा वापर वाढवून पॅकेजिंगसाठी झाडे कापली जाऊ नयेत यासाठीही फ्लिपकार्ट प्रयत्न करत आहे.

**फ्लिपकार्टतर्फे केले जाणारे इतर प्रयत्न:**

- जबाबदारीपूर्ण वनीकरण आणि सोर्सिंग
- पुरवठा साखळीत प्लास्टिक फ्री रीटर्न्स
- विक्रेत्यांसाठी प्लास्टिकमुक्त रिटर्न

पॅकेजिंगसाठी शाश्वत पर्याय वापरण्याची फ्लिपकार्टची बांधिलकी यातून अधिक दृढ होईल आणि सर्वांगिण, शाश्वत प्रगतीचे त्यांचे उद्दिष्टही साधले जाईल. कमी कार्बन उत्सर्जन अर्थव्यवस्था असा बदल करण्यासाठी फ्लिपकार्टने २०३० पर्यंत शहरातील आपल्या लॉजिस्टिक नेटवर्कमध्ये १०० टक्के इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्याचे लक्ष्य राखले आहे. फुलफिलमेंट सेंटर्स आणि डेटा सेंटर्स अशा आपल्या सर्व धोरणात्मक केंद्रामध्ये जलव्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि एकूणच ऊर्जा व्यवस्थापन अधिक सुधारण्यासाठी फ्लिपकार्ट अक्षय्य ऊर्जेचा अधिक वापर आणि विविध प्रकल्प राबवून आपल्या कार्यचलनात स्रोत परिणामकारकतेवर भर देत आहे. फ्लिपकार्टची बहुतांश केंद्रे आता ISO 14001 प्रमाणित आहेत आणि कंपनीची अनेक मोठी गोदामे आयजीबीसीच्या ग्रीन बिल्डिंग गाइडलाइन्सनुसार विकसित केली जात आहेत.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale and Cleartrip. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of more than 350 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, Flipkart Wholesale and Cleartrip, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

For more information, please write to media@flipkart.com